प्रेस नोट क्र. ७५/२०२४,
स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सांगली.
दिनांक २६.०७.२०२४.

प्रेस नोट

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सांगली यांची कारवाई

# महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला सुगंधी तंबाखु व गुटख्याची अवैध वाहतुक करणारा ट्रक व आरोपी जेरबंद — ७३,६०,८२०/- रु. चा मुद्देमाल हस्तगत.

| पोलीस स्टेशन | अपराध क्र आणि कलम | फिर्यादी नाव |
|---|---|---|
| उमदी पोलीस ठाणे | गु.र.नं. १९१/२०२४<br>बि. एन. एस कलम १२३, २२३<br>अन्न सुरक्षा आणि मानके अधि-<br>२००६ चे कलम ५९ प्रमाणे | दऱ्याप्पा दिगंबर बंडगर, नेम-<br>स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा,<br>सांगली. |
| **गु.घ.ता वेळ** | **गु.दा.ता वेळ** | **विशेष कामगिरी** |
| दि. २६.०७.२०२४ रोजी सकाळी ०९.४५ वा चे दरम्यान | ता. २६.०७.२०२४ रोजी ०८.१० वा. | पोहेकॉ/ १७६९ आमसिद्ध खोत |

**कारवाई करणारे अधिकारी आणि अंमलदार**

पोलीस निरीक्षक सतिश शिंदे, स्था. गु. अ. शाखा,
सहा. पोलीस निरीक्षक संदीप कांबळे, उमदी पोलीस ठाणे,
पोलीस उप निरीक्षक कुमार पाटील, स्था. गु. अ. शाखा,
पोहेकॉ/सागर लवटे, दरिबा बंडगर, अमर नरळे, पोना/ प्रकाश पाटील,
चालक पोशि/ सुशांत चिले, स्था. गु. अ. शाखा,
पोहेकॉ/ आप्पासाहेब हाक्के, पोहेकॉ/ संतोष माने, पोशि/ आप्पासाहेब घोडके, उमदी पोलीस ठाणे,
पोशि/ कॅप्टन गुंडवाडे, सायबर पोलीस ठाणे.

**अटक वेळ दिनांक दि. २६/०७/२०२४ रोजी**

**आरोपीचे नांव पत्ता**

रवि अर्जुन होळकर, वय ३४ वर्षे, रा. कासरुडी यवत, ता. दौंड, जि. पुणे.

**जप्त मुद्देमाल**

| | | |
|---|---|---|
| १. | २,४९,६००/- | रु. किंमतीचे एक सुतळी बारदान मध्ये ०४ पांढऱ्या रंगाची पोती प्रत्येक पोत्यामध्ये केशरयुक्त विमल पान मसाला लिहीलेले लाल रंगाचे प्लॅस्टिकचे ५२ पाकीट व प्रत्येक पाकीटात ३० पुडया अशा एकुण ६२४० पुडया प्रति पुडी ४ रु. दराने प्रती बारदान किंरु. २४९६/- प्रमाणे १० बारदानाची कि. रुपये. |
| २. | १,७१,६००/- | रु किमतीचे एक सुतळी बारदान मध्ये ०५ पांढऱ्या रंगाची पोती प्रत्येक पोत्यामध्ये ०४ पांढऱ्या रंगाची लहान पोती, पत्येक लहान पोत्यात वि-१ तंबाखु लिहीलेले निळया रंगाचे प्लॅस्टिकचे ५२ पाकीट व प्रत्येक पाकीटात २२ पुडया अशा एकुण २२,८८० पुडया प्रति पुडी १.५ रु. दराने प्रती बारदान किं. रु. ३४,३२०/- प्रमाणे ०५ बारदानाची कि. रुपये. |
| ३. | २,७०,२५०/- | रु. किमतीचे एक पडयाच्या बॉक्समध्ये ०५ पांढऱ्या रंगाची पोती प्रत्येक पोत्यामध्ये |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | केशरयुक्त विमल पान मसाला लिहीलेले लाल रंगाचे २० कागदी बॉक्स व प्रत्येक बॉक्स १० पुडया तसेच १० प्लॅस्टिकचे पाकीटात ३० पुडया अशा एकुण ११५० पुडया प्रति पुडी ४७१.५ रु. दराने प्रति बॉक्स किं. रु. ५४०५०/- प्रमाणे ०५ पुड्ड्याचे बॉक्स कि. रुपये. |
| ४. | १७,२५०/- | रूपये एका पुठठयाच्या बॉक्समध्ये ०५ पांढ-या रंगाची पोती, प्रत्येक पोत्यामध्ये वि-१-बिग असे लिहीलेले लाल रंगाचे २० बॉक्स व प्रत्येक बॉक्स मध्ये १० पुडया तसेच १० प्लॅस्टिकचे पाकीटात ३० पुडया अशा एकुण ११५० पुडया प्रति पुडी ३ रूपये दराने प्रती बॉक्स किंरु ३४५०/- प्रमाणे एकुण ०५ पुठठयाचे बॉक्स किं. रू |
| ५. | ४,८४,०००/- | रूपये एका सुतळी बारदान मध्ये ०५ पांढ-या रंगाची पोती, प्रत्येक पोत्यामध्ये १० पांढ-या रंगाची लहान पोती, प्रत्येक लहान पोत्यात वि-१-तंबाखु असे लिहीलेले हिरव्या रंगाचे प्लॅस्टिकचे २२ पाकीट व प्रत्येक पाकीटात ११ पुडया अशा एकुण १२१०० पुडया, प्रति पुडी २ रूपये दराने प्रती बारदान किं. रू. २४२००/- प्रमाणे एकुण २० बारदानाची किं. रू. |
| ६. | ३१,२००/- | रूपये एका सुतळी बारदान मध्ये ०५ पांढ-या रंगाची पोती, प्रत्येक पोत्यामध्ये ०४ पांढ-या रंगाची लहान पोती, प्रत्येक लहान पोत्यात वि-१-तंबाखु असे लिहीलेले लाल रंगाचे प्लॅस्टिकचे ५२ पाकीट व प्रत्येक पाकीटात ३० पुडया अशा एकुण ३१,२०० पुडया, प्रति पुडी १ रूपये दराने किं. रू. |
| ७. | ७,७७,९२०/- | रूपये एका सुतळी बारदान मध्ये ०४ पांढ-या रंगाची पोती, प्रत्येक पोत्यात केशरयुक्त विमल पान मसाला असे लिहीलेले निळया रंगाचे प्लॅस्टिकचे ५२ पाकीट व प्रत्येक पाकीटात २२ पुडया अशा एकुण ४५७६ पुडया, प्रति पुडी ८.५० रूपये दराने प्रती बारदान किंरु ३८८९६/- प्रमाणे एकुण २० बारदानाची किं. रू. |
| ८. | ४३,५६,०००/- | रूपये एका सुतळी बारदान मध्ये १० पांढ-या रंगाची पोती, प्रत्येक पोत्यात केशरयुक्त पान मसाला असले लिहीलेले हिरव्या रंगाचे प्लॅस्टिकचे २२ पाकीट व प्रत्येक पाकीटात ११ पुडया अशा एकुण २४२० पुडया, प्रति पुडी १८ रूपये दराने प्रती बारदान किंरु ४३,५६०/- प्रमाणे एकुण १०० बारदानाची किं. रू. |
| ९. | १०,००,०००/- | किंमतीचे अशोक लेलण्ड कंपनीचा लाल रंगाचा माल वाहू ट्रक तिचा आर टी ओ क्र. **KA 29 A2588** असा जु. वा. किं. अं. |
| १०. | ३०००/- | रू सहा सुतळी बारदानाची नारळ असलेली पोती जु. वा. किं. अ. |
| | ------------------- | |
| | ७३,६०,८२०/- | ( त्र्याहत्तर लाख साठ हजार आठशे वीस रुपये ) |

गुन्हयाची थोडक्यात हकीकत -----

मा. पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेस अवैध धंद्याची माहिती घेवून त्यांचेवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

सदर सुचनेप्रमाणे पोलीस निरीक्षक सतिश शिंदे, स्था. गु. अ. शाखा यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडील पोलीस उप निरीक्षक कुमार पाटील व स्टाफ यांचे एक पथक तयार करुन अवैध गुटखा विक्री व वाहतुक करणाऱ्या लोकांची माहिती घेवून त्यांचेवर कारवाई करणेकरीता आदेशीत केले होते.

त्या अनुशंगाने दि. २६/०७/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडील पोलीस उप निरीक्षक कुमार पाटील यांचे पथक शासकीय वाहनाने अंकलगी ते उटगी रोडने पेट्रोलिंग करीत असताना, मालवाहु ट्रक क्र. **KA 29 A 2588** भरधाव वेगाने निघून गेला. सदर वाहनाचा संशय आल्याने त्या मालवाहतूक ट्रकला थांबवून चालकास त्याचे नाव गाव विचारता त्याचे नाव रवि अर्जुन

Scanned with CamScanner

होळकर, रा. कासरुडी यवत, ता. दौंड, जि. पुणे असे असलेचे सांगितले. नमुद वाहन चालकांस त्याचे कडे वाहन चालविण्याचा परवाना आहे का? तसेच त्याचे वाहनांमध्ये कोणता माल भरला आहे? तसेच त्याची बिल पावती आहे काय याबाबत त्याचेकडे विचारणा केली. तसेच त्याचे ताबेत असलेल्या वाहना मध्ये कोणता माल भरला आहे त्याबाबत रवि होळकर यास विचारण केली असता तो काही एक समाधानकारक माहिती न देता उडवाउडवीची उत्तरे देवु लागला.

त्याचा संशय आल्याने सदरचा मालवाहु ट्रक उमदी पोलीस ठाणेस घेवून जावून पोलीस उप निरीक्षक कुमार पाटील यांनी पंचासमक्ष रवि होळकर याचे ताब्यातील वाहनाची झडती घेतली असता, त्यामध्ये वरील वर्णनाचा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला सुंगधी तंबाखु व गुटख्या मुद्देमाल मिळुन आला. त्याबाबत त्याचेकडे विचारणा केली असता त्याने सांगितले की, सदर गाडी मध्ये सुगंधी असलेला पान मसाला व गुटख्या मुद्देमाल हा मॉन्टी ऊर्फ दर्शन तुरेकर रा. हडपसर पुणे यांचे सांगणेवरून विजापुर येथून आणला असल्याची कबुली दिली.

लागलीच सदर ठिकाणी मिळून आलेल्या मुद्देमालातील गुटख्याचे रासायनिक तपासणीसाठी सॅम्पल घेऊन पंचासमक्ष सदरचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सदर आरोपीवर उमदी पोलीस ठाणेस याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास उमदी पोलीस ठाणे करीत आहे.

( सतिश शिंदे )
पोलीस निरीक्षक,
स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सांगली.

Scanned with CamScanner